**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/आव्यप्र-१
आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन ,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २९ मे, २०२०

प्रति,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
२. पोलीस आयुक्त,मुंबई / पोलीस आयुक्त (सर्व)
३. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी / जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)

**विषय : <u>जैन समाजाचा चातुर्मास सुरू होत असल्याच्या पार्श्वभुमीवर साधु-साध्वींना प्रवास करण्याची परवानगी देण्याबाबत..</u>**

महोदय,

जैन समाजाच्या चातुर्मास पर्वास जुलै महिन्यात प्रारंभ होत असून या चातुर्मास काळात जैन समाजाचे साधु साध्वी निश्चित केलेल्या चातुर्मास स्थळी पोहचविण्यासाठी पायी प्रवास करित असतात. काही वृध्द साधु-साध्वी प्रकृतीच्या कारणास्तव व्हील चेअरने प्रवास करतात. या प्रकारे प्रवास करून हे साधु-साध्वी चातुर्मास स्थळी त्यांच्या सेवक वर्गासह पोहचतात.

२. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर देशात लॉकडाऊन सुरू असल्यामुळे अनेक भागातून साधु-साध्वी प्रवास करू शकत नाहीत. परंतु चातुर्मास सुरू होण्यापूर्वी त्यांना त्यांच्या निर्धारित स्थळी पोहचणे आवश्यक आहे. त्यामुळे जैन समाजाच्या साधु-साध्वी व सेवक वर्ग यांना त्यांच्या चातुर्मास स्थळी पोहचण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे:

१) पायी प्रवासा दरम्यान गर्दी होणार नाही व ५ पेक्षा जास्त जण एकत्रित प्रवास करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
२) ज्या ठिकाणी त्यांचा मुक्काम आहे, त्याठिकाणी गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
३) कोव्हीड-१९ संदर्भातील केंद्र व राज्य शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करावे.
४) प्रवासा दरम्यान २ व्यक्तीमध्ये पुरेसे अंतर ठेवावे (Social Distancing) व मास्कचा वापर करण्याची दक्षता घ्यावी.

३. त्यांच्या प्रवासादरम्यान व मुक्कामाच्या ठिकाणी त्यांची सुरक्षितता व एकूणच कायदा व सुव्यवस्था राखली जाईल याची जिल्हा व पोलीस प्रशासनाने दक्षता घ्यावी.

किशोरराजे निंबाळकर

(किशोर राजे निंबाळकर)
सचिव, महाराष्ट्र शासन

C:\Users\medha.gadgil\Desktop\कोरोना\Foot Journey of Acharya Mahashramanji.docx

Scanned with CamScanner